PlanetRead

Literacy for a Billion

Movie: Dhoom Dhadaka
Year: 1985

Song: Ag Ag Pori Faslis Ga
Lyricist: Shantaraam Nandgaonkar

अगं अगं पोरी फसलीस गं
आ हां...
अगं अगं पोरी फसलीस गं
मुकाट गाडीत बसलीस गं
आता ये ना इकडं
जाऊ जरा तिकडं ये ना
हट बाजूला हो तू पोरा रं
हट बाजूला हो तू पोरा रं
दावू नको तुझा तोरा रं
शिरजोरा जा तुझा कागद राहील कोरा
अगं अगं पोरी फसलीस गं
हट बाजूला हो तू पोरा रं

हे सजणी तुला सजवीन
संगतीनं मिरवीन
सजणी तुला सजवीन
संगतीनं मिरवीन
सोडून राग कानात सांग
होशिल का माझी राणी
लाडीगोडी दावून
मधाचं बोट लावून
लाडीगोडी दावून
मधाचं बोट लावून
भुलायची मी नाही तुला
गाऊ नको अशी गाणी
हे जरा थांब
जा रे लांब

अगं ये जवळी
नको ऐशा भलत्या वेळी

अगं अगं पोरी फसलीस गं
अगं अगं पोरी फसलीस गं
गालात खुदकन हसलीस गं

हो... चांदण्याच्या पावलांनी
रात फुलली हो
हो... चांदण्याच्या पावलांनी
रात फुलली हो
तुझी माझी प्रीती मोहरली
रातराणी गंध वेडी
बघ हसली
रातराणी गंध वेडी
बघ हसली
तुझी सखी राया बावरली
अशा धुंदीनं
तुझ्या छंदानं
अशा धुंदीनं
तुझ्या छंदानं
बेभान मने झाली
अगं अगं पोरी फसलीस गं
अगं अगं पोरी फसलीस गं
गालात खुदकन हसलीस गं
आता ये ना इकडं
जाऊ जरा तिकडं ये ना

*Disclaimer: PlanetRead does not own these lyrics and is not using them for any commercial purpose. For over 20 years, PlanetRead has been subtitling Bollywood songs for mass literacy. These lyrics are being offered as part of PlanetRead's literacy development initiative.*

*PlanetRead is a tax-exempt, not-for-profit: 501(c) (3) in the United States and 80(G) in India.*